# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ आणि शेतकरी संघटनेतील गटबाजीचे राजकारण

**प्रा. डॉ. संजय सागरु सपकाळ,** राज्यशास्त्र विभाग,
श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, sanjaysapkal71@gmail.com

---

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी आपले विचार मांडले व शेतीच्या प्रश्नांकडे शासन लक्ष वेधण्याचे कार्य केले. महात्मा फुले यानी आपल्या 'शेतकयांचे असूड' या ग्रंथात शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे कार्य केले. १९०३ ते १९०६ या काळात ना. गोखल्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात शेतकऱ्यांचे प्रश्न व त्यावरील उपाययोजनांबाबत विचार मांडले. १९१८ मध्ये पुणे येथील शेतकरी परिषदेत महर्षी आण्णासाहेब शिंदे यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावी यासाठी त्यांना संघटीत करण्याचे कार्य केले.

थोडक्यात शेती विषयक प्रश्न शेतकरी व शेतमजुरांचे प्रश्न त्यांची सोडवणूक आणि त्यांचे संघटन करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच झालेले आहेत. परंतू शेतकऱ्यांचे संघटन करून शेतकरी चळवळ म्हणून आपले अस्तित्व या काळात निर्माण होवू शकेल नाही. १९४० ते १९७५ या काळात शेतकरी कामगार पक्षाने कांही प्रमाणात तसा प्रयत्न केला होता. परंतू राजकारणाच्या कक्षेत राहूनच या पक्षात हे कार्य केलेले दिसते. त्यामुळे त्यास शेतकरी चळवळ असे म्हणता येणार नाही महाराष्ट्रात १९८० च्या दरम्यान शेतकऱ्यांची संघटना स्थापन होऊन शेतकरी चळवळीला खऱ्या अर्थाने दिशा मिळालेली दिसते. महाराष्ट्रात एक प्रमुख राजकीय शक्ती म्हणून उदयाला आलेल्या आणि शेतकऱ्यांचा हितासाठी प्रभावीपणे आंदोलने करणाऱ्या शेतकरी संघटनेत आज गटबाजी व फाटाफुटीने ग्रासले आहे. आजवर अनेक महत्वाचे नेते आणि कार्यकर्ते शेतकरी संघटनेतून बाहेर पडून आपला वेगळा गट निर्माण करू पहात आहेत. या सर्व गटबाजीचा शोध घेणे उचित वाटते. यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून ऐतिहासिक दृष्टीकोणातून मांडणी केली आहे.

**शेतकरी चळवळीची पार्श्वभूमी-**

१९८० पूर्वी महाराष्ट्रात काही भागातील शेतकऱ्यांवरील अन्यायाविरुद्ध काही प्रमाणात उठाव व आंदोलने झाली होती सावकारांकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि शेती व्यवसायाचे व्यापारीकरण या विरुध्द १८७५ साली पुणे व नगर भागातील कांही खेड्यामध्ये मर्यादीत स्वरुपाचे आंदोलन घडले. या आंदोलनात तेथील एक हजार शेतकऱ्याना अटक करण्यात आली होती. पुण्याच्या सार्वजनिक सभेने या उठावावर नेमलेल्या 'डेक्कन रॉयट्स कमिशन' ला निवेदन सादर करून या शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी १९२०-२१ च्या दरम्यान धरणग्रस्त, जंगलग्रस्त, जमिनी सावकारी, वेठबिगारी इ. प्रश्नांवर 'वारली' जमातीत जन आंदोलन घडवून आणली होती.

१९४७ नंतर कुळकायदा, शेतकरी कर्ज निवारण कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, कुळाला काढून टाकण्याचा जमिनदारांचा हक्क मर्यादित करणे, जमिनीच्या खरेदी विक्रीवर निर्बंध घालणे आणि आर्थिक पिळवणूकीपासून त्यांचे रक्षण करणे इ. उद्देशाने निर्माण केलेले कायदे मात्र कागदावरच राहिले पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटने महाराष्ट्रातील कुळ कायद्याच्या अंमलबजावणीबद्दलची पहाणी करून तसा अहवाल प्रसिद्ध केला होता. खेड्यातील आर्थिक जीवनावर व्यापारी, जमिनदार सावकार याची घट्ट पक्कड निर्माण झालेली असून या वरिष्ठ वर्गाशी नेटाने झगडू शकेल. अशी जोरदार संघटना खेडयात अस्तित्वात आल्याखेरीज शेतकऱ्यांची ही पिळवणूक थांबणे शक्य नाही. यातूनच पुढे शेतकरी संघटीत होण्यास चालना मिळाली व शेतकरी चळवळ उभी राहण्यास प्रेरणा मिळाली. त्यासाठी १९८० साल उजाडावे लागले.

**शेतकरी आंदोलनांची वाटचाल:**

१९७३ पासून देशातील कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, मध्यप्रदेश, पंजाब इ. विविध राज्यात शेतकऱ्यांची आंदोलने प्रभावीपणे चालू होती. महाराष्ट्रात १९७८-१९७९ च्या दरम्यान श्री शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी

आंदोलनास सुरवात झाली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य व रास्त भाव मिळावा यासाठी ही प्रथम आंदोलने करण्यात आली. या आंदोलनात माधवराव बोरस्ते, प्रल्हाद पाटील, बोरावके, म्हात्रे, गोरे इ. मंडळीनी पुढाकाराने भाग घेतला होता. शेतकरी संघटनेत राजकीय सत्तेशी संघर्ष करून आपल्या मागण्या मंजूर करून घेऊ हा दृष्टीकोण कै. माधवराव बोरस्ते यांचे अनुयायी माधवराव मोरे, रामचंद्र पाटील या गटाने अवलंबिला व राजकारणाशी संबंध ठेवून संघटनेने आपले आंदोलनाचे कार्य चालू ठेवावे असा आग्रह धरला तर सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून कार्य करणे आणि वैचारिक जागृती, संघटनात्मक आंदोलन व चळवळ या गोष्टींना महत्व अलिबागच्या दुसऱ्या गटाने दिल्याचे दिसते व सत्तेचा राजकारणापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतलेला दिसून येतो.

महाराष्ट्रात १९७५ ते १९८३ हा शेतकरी आंदोलनाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. शरद जोशी यांनी दोन्ही गटाची मते विचारात घेऊन शेतकरी संघटनेची भूमीका संदिग्ध ठेवावी. राजकारण व राजकीय प्रवाहापासून दूर न राहता, त्याच्याशी संबधीत राहील्यासच आपणास दबाव गटाची भूमीका पार पाडता येईल असे शरद जोशींचे धोरण दुटप्पी बनले त्यामुळे शेतकरी संघटनेच्या कार्यात शुद्ध चळवळ व राजकारण अशी दुहेरी भूमिका निर्माण, होऊन चळवळ संभ्रमात पडल्याचे दिसते. अर्थात राजकारणाला शेतकरी संघटनेचा उपयोग वा फायदा होईल. याच भावनेने अनेक राजकीय पक्षानी व त्यांचा कार्यकर्त्यांनी शेतकरी आंदोलनास वेळोवेळी पाठींबा दिल्याचे महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून येते. शेतकरी आंदोलनात-शरद जोशी यांनी आपल्या नेतृत्वाखाली कांदा, ऊस, तंबाखु, दुध या संदर्भात जोरदार आंदोलने केली व शासनावर विशेष प्रभाव पडला आणि शेतकरी संघटना दबाव गटाची भूमीका पार पाडण्यात यशस्वी ठरली. या आंदोलनात कांदा आंदोलन, ऊस आंदोलन व तंबाखु आंदोलनाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. परंतू दुध आंदोलनात मात्र संघटनेला माघार घ्यावी लागली. दूध आंदोलनाचा फटका बसल्यानंतरच शेतकरी संघटनेने आपल्या संघटनात्मक बांधणीकडे लक्ष वळविले निश्चित ध्येये व उदिष्टये, विशिष्ट कार्यपद्धती, चळवळ व परिवर्तनाची दिशा या अभावी संघटन होऊ शकत नाही. याची जाणीव त्यांना झाली आणि खऱ्या अर्थाने संघटनात्मक बांधणीत १९८३ च्या मनमाडच्या अधिवेशनापासून सुरवात झालेली आहे.

**शेतकरी संघटना व राजकारण:**

महारष्ट्रात शेतकरी संघटनेने राजकारणापासून अलिप्त राहून सत्ताधारी राजकारणी, श्रीमंत बागायतदार शेतकरी यांच्यावर वारेमाप टीका केली परंतू सत्ताधारी व राजकारणी यांच्याबाबत तीरस्थराने आपणास काहीही साधता येणार नाही व ते संघटनेच्या हिताचे ठरणार नाही हे ओळखून या संघटनेने शासनावर विविध मार्गांनी आंदोलन करून व प्रभाव पाडून आपल्या मागण्या मंजूर करून घेण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे शेतकरी संघटनेला दबाव गटाचे स्वरूप प्राप्त झाले. १९८३ च्या मनमाड अधिवेशनानंतर स्थानिक परिस्थिती आणि राजकारण पाहून सत्तेच्या राजकारणात सोयीनुसार सहभागी व्हावे अशी भूमीका शेतकरी संघटनेने घेतली आणि काही साखर कारखान्याच्या निवडणुकीत आपली पॅनेल्स विजयी केली. पुढे शरद पवारांच्या पुलोद आघाडीस जाहीर पाठिंबा देऊन या संघटनेने उघडपणे राजकीय भूमिका घेण्यास सुरवात केली. १९८४-८५ च्या विधानसभा निवडणूकीत भाग घेतला. अशा प्रकारे राजकारणाशिवाय संघटनेस प्रभाविपणे आपल्या प्रश्नांची सोडवणुक व हिताची जोपासना करता येणार नाही. म्हणून राजकारणात सत्तास्पर्धा करून आपले प्रतिनिधी पाठविण्याचा निर्धार संघटनेने केलेला दिसून येतो.

शेतकरी संघटनेने निर्माण केलेले शेतकऱ्यांचे प्रश्न आज सर्वच राजकीय पक्षानी सोडविण्याचे धोरण अवलंबिले असल्यामुळे राजकीय पक्षांच्या सत्तास्पर्धेत शेतकरी संघटनेचा टिकाव धरू शकेल असे वाटत नाही कारण महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी वर्ग या शेतकरी संघटनेत सामिल झालेला नाही. ते विविध राजकीय पक्षात कार्यकर्ते व सभासद म्हणून समाविष्ठ झालेले आहेत, त्यामुळे शेतकरी संघटनेस सर्व थरातून भरघोस पाठींबा मिळत नाही. तसेच राजकारणाच्या मागे लागलेली हि संघटना, शेतकऱ्यांचे हितसंबंध जोपासू शकेल काय? या बाबत शेतकरी वर्गात संभ्रम निर्माण झालेला आहे. सहकार क्षेत्रातील बहुतांशी साखर कारखान्यावर श्रीमंत बागायतदार, व्यापारी, भांडवलदारांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याने त्यांची 'शुगर लॉबी' तयार झालेली आहे. तिचा प्रभाव सार्वत्रिक निवडणुकांवर पडलेला दिसतो.

**शेतकरी संघटनेतील गटबाजीचे राजकारण:**

पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून शेतकरी संघटनेचे कार्य चालू ठेवल्यामुळे शरद जोशी खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोहचले, शरद जोशींनी १९७८ से १९८८ या काळात केलेल्या विविध आंदोलनांना शेतकरी वर्गाने प्रचंड पाठींबा दिला. शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या आंदोलनांना लाखोंच्या संख्येने शेतकरी उपस्थित राहू लागले. परंतु

पक्षविरहीत संघटना उभी करण्यासाठी पाळावयाची पथ्ये, शेतकरी संघटनेने पाळली नाहीत. राजकीय निवडणुकीत भाग न घेणे, निवडणुकीत भाग घेणाऱ्यांन पाठींबा न देणे, चळवळीतील कार्यकर्त्यांनी निवडणुकीत संघटनेची पुण्याई न वापरणे अशी पथ्ये शेतकरी संघनेने व शरद जोशीनी पाळली नाहीत. त्यामुळे ही संघटना पक्षविहित राहीली नाही. सूरवातीला राजकारणापासून अलिप्त राहण्याची भूमिका नंतरच्या काळात विविध पक्षांना पाठिंबा देण्याची भूमीका आणि सर्वात शेवटी राजकीय पक्ष स्थापन करून निवडणूका लढविणे व सत्ताधारी पक्षाच्या मदतीने राजकीय पदे मिळवीणे उदा. भाजपच्या मदतीने शरद जोशी राज्यसभा सदस्य बनले. राजकारणाबद्दलच्या धरसोड वृत्तीमुळे अनेक कार्यकर्ते संघटनेपासून दूर गेले. भाजप सारख्या हिंदुत्ववादी पक्षाची मदत घेतल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात राजू शेट्टी यांनी स्वतंत्र संघटना स्थापन केली

राजू शेट्टी हे पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख शेतकरी नेते मानले जातात. रघुनाथदादा पाटील, राजू शेट्टी हे शरद जोशीच्या बरोबरीने शेतकरी संघटनेत कार्य करीत होते. शरद जोशी आणि शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी झालेल्या वैचारिक मतभेदातून त्यांनी संघटना सोडली. २००१ मध्ये स्वाभिमानी संघटनेची स्थापना केली. राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत हे स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते होते. २००४ मध्ये संघटनेच्या नेत्यांनी स्वाभीमानी गटाची स्थापना केली. राजू शेट्टी हे पक्षाचे अध्यक्ष तर सदाभाऊ खोत है प्रवक्ते होते. स्वाभीमानी शेतकरी संघटना प्रामुख्याने ऊस व दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढा देत आलेली आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील साखर लॉबीकडून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाच्या विरोधात संघटनेने सातत्याने लढे दिले. महाराष्ट्रात जवळ जवळ २ कोटी ५ लाख ऊस उत्पादक आहेत. १८८ साखर कारखाने आहेत. साखर कारखानदाराकडून शेतकऱ्यांची संघटीतपणे लुट केली जाते. ऊसाला हमी भाव मिळावा यासाठी संघटनेने रास्ता 'रोको, ऊस तोडणीस बंदी, साखर कारखान्यावर बहिष्कार इ. मार्गाचा वापर केला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मंथन करण्यासाठी ऊस उत्पादक परीषद बोलावून त्यामध्ये ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर चर्चा केली जाते.

दुधाच्या भावावरून संघटनेने सातत्याने आंदोलने केली व शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांची कर्जमाफी, सातबारा कोरा करणे अशा अनके मागण्या संघटनेने उचलून धरल्या व आंदोलनाना गती देण्याचा प्रयत्न केला. सर्व प्रथम २००२ मध्ये उदगांव मतदार संघातून राजू शेट्टी जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले. २००४ मध्ये शिरोळ मतदार संघातून अपक्ष आमदार म्हणून निवडून आले. २००९ मध्ये हातकणंगले मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आले. निवडणुकीत त्यानी शेतकऱ्यांकडून एक-एक रूपया निवडणुक निधी घेऊन निवडणुक लढवली. त्यांनी लढविलेल्या निवडणुका चर्चेचा विषय ठरला. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल नरेंद्र मोदी यांनी स्वामिनाथन आयोगाच्या, शिफारशी लागू करण्याच्या आश्वासनामुळे स्वाभिमानी पक्ष हा राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) चा घटक पक्ष बनला. २०१४ मध्ये सदाभाऊ खोत यांनी, माढा मतदार संघातून तर राजू शेट्टी यांनी हातकणंगले मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढविली. यामध्ये सदाभाऊ खोत हे माढया मधून पराभूत झाले तर राजू शेट्टी विजयी झाले.

विधानसभा निवडणुकीत पक्षाने भाजपसोबत युती केली. भाजप- शिवसेना युतीच्या सरकारला पाठींबा दिला. पाठींबाच्या मोबदल्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदाभाऊ खोत यांचा विधानपरिषद सदस्य आणि काही काळानंतर मंत्रिमंडळात समावेश केला. सदाभाऊ खोत हे महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात शेती बांधकाम आणि पणन खात्याचे मंत्री झाले. कर्जमाफीच्या प्रश्नावरून सदाभाऊ खोत आणि राजू शेट्टी यांच्यात मतभेत झाले. सदाभाऊ खोत यांनी स्वाभिमानी पक्षातून बाहेर पडून 'रयत क्रांती संघटना' स्थापन केली. राष्ट्रीय लोकशाही आघाड़ी सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळे राजू शेट्टी हे एनडीएतून बाहेर पडले आणि नंतर २०१९ मध्ये काँग्रेस पक्षाशी हातमिळवणी केली. त्यामुळे राजू शेट्टीना लोकसभा निवडणुकी मध्ये पराभव पत्करावा लागला. या सर्वामध्ये चळवळीत फूट पाडण्यासाठी भाजप असो अगर काँग्रेस या पक्षांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे फूट पाडणात यशस्वी झाले. चळवळींच्या नेतृत्वाला लागलेला राजकीय हव्यास हा निमित्त ठरला व चळवळीचा ऱ्हास झाला. राजकीय हव्यासाचा कटू अनुभव शेतकरी संघटनेचे शरद जोशी यांना घ्यावा लागला होता. तसा राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांना घ्यावा लागला.

**समारोप:**

शेतकरी संघटनेचा महाराष्ट्रातील समाजकारण आणि राजकारणातील प्रभाव कमी झालेला असला तरी संघटनेच्या कार्यातून महाराष्ट्रातीत विविध भागात नेतृत्व निर्मिती झालेली दिसते. संघटनेने केलेल्या प्रभावी कार्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सरकारी पातळीवर मोठ्या प्रमाणात चालना मिळालेली दिसते. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमी भाव मिळू लागल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होऊ लागली, वाढत्या भांडवलामुळे शेती प्रगत होण्यास मदत झालेली दिसते.

शेतकऱ्यामध्ये एकात्मता विकसीत करणात संघटनेने प्रभावी भूमिका बजावली. संघटनेच्या प्रभाव कमी झालेला असला तरी शेतकऱ्यामध्ये झालेल्या जागृतीमुळे ते आपापसातील मतभेद विसरून लवकर एकत्र येतात हे चित्र शेतकरी संप व कृषी विरोधी कायदा विरोधी आंदोलनाने अनुभवले आहे.

शेतकरी चळवळीचे नेते राजकारणात भाग घेऊन तत्वाला मुरड घालून युती वा आघाडी करतात. चळवळ राजकारणाच्या दावणीला बांधून मोकळे होतात हाच अनुभव शरद जोशी, रघुनाथदादा पाटील, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत यांच्या चळवळीत लोकांना आला. राजू शेट्टी आणि स्वाभिमानी संघटनेचा कार्यावर अनेक टिका केल्या जात असल्या तरी पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी चळवळ टिकवून ठेवण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. पश्चिम महाराष्ट्रातील दूध उत्पादक आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठी ताकद त्यांच्या नेतृत्व त संघटनेच्या मागे उभी आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटना हा महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी संघर्ष करणारा आणि आवाज उठविणारा प्रभावशाली दबावगट आहे.

शेतकरी चळतळीत काम करणाऱ्या नेत्यांच्या राजकीय महत्वाकांक्षा लपून राहीलेल्या नाहीत, हेच आता स्पष्ट होते आहे. वास्तविक राजकीय संघटनांच्या प्रभावास आव्हान देण्याचे काम शेतकरी संघटीत होऊन देऊ शकतो, हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. त्यासाठी निवडणुका किंवा सरकारमध्ये जाण्याचा निर्णय असावा लागतो; मात्र अलीकडे सत्तेत जाण्याचा मार्गच म्हणून शेतकरी चळवळीकडे पाहिले जाऊ लागले आहे. त्यांचा परिणाम राजकीय भूमिका घेण्यावर झाला आहे. त्यातून शेतकरी चळवळीत वारंवार फूट पडून वेगवेगळया चार-पाच संघटना, महाराष्ट्रामध्ये काम करू लागल्या आहेत. हे संघटनांचे गट मोठे होणार नाहीत, उलट शेतकरी आंदोलनाची ताकद कमी पडणार आहे. राजकीय निवडणूकांना सामोरे जावेच लागते हे जरी खरे असले, तरी ते एक आंदोलनाचे हत्यार म्हणून वापरणे आवश्यक आहे. अन्यथा जे राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या हित्ताविरोधी भूमिका घेतात, त्यांची भलावण करण्याची वेळ येते. याचा राजू शेट्टी यांना चांगला अनुभव आला आहे.

**संदर्भ:**

१) ' फूले महात्मा', 'शेतकऱ्यांचा आसूड',
२) पेंडसे डॉ. अरुणा, 'महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ',
३) पाटील डॉ. महेंद्र, 'महाराष्ट्रातील सामाजीक, राजकीय, चळवळी'
४) ढवळे डॉ. अशोक, 'महाराष्ट्र राज्यातील किसान चळवळ'
५) देशमुख डॉ. पंजाबराव, 'श्री शिवाजी शिक्षण संस्था', अमरावती विशेषांक.
६) जाधव, रमेश, 'स्वामिनाथन आयोग', पुणे, साधना साप्ताहिक, मार्च २०१८.
७) राणा, अशोक, 'जागतिकीकरण आणि शेती',अक्षरगाथा मासीक मार्च २०१८.
८) देसाई आर.एस., 'भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक दृष्टीक्षेप',
९) पुरोगामी, 'सत्यशोधक' मासिक जून २०१७ .
१०) कुरणे सुनिलकुमार, 'शेतकरी चस्तळ व शेतकरी संघटना', लोक आविष्कार मासिक ऑगस्ट २०१३.
११) 'लोकमत', १३ ऑक्टोबर, २०१८. भोसले वसंत, 'शेतकरी संघटनांचे राजकीय पेव'
१२) 'महाराष्ट्र टाइम्स', ४ सप्टेंबर २०१७, ४ जूलै २०१७.
१३) कोल्हे अविनाश, शरद जोशी, 'शेतकरी संघटना आणि शेट्टी- खोत संघर्ष', महासभा, २५ सप्टेंबर २०१७
१४) मुटे गंगाधर, 'शेतकरी चळवळीचे भवितव्य आणि आव्हाने', ४ डिसेंबर, २०१६ महाराष्ट्र टाईम्स